## वाढदिवस शुभेच्छा




विजय सुरवाडे
जिल्हा उपाध्यक्ष,
आम आदमी पार्टी

मान्यवरांच्या वाढदिवसापूर्वी एक दिवस आधी हितचिंतकांनी खालील ई-मेल आयडीवर संपूर्ण नाव छायाचित्रासह माहिती पाठवावी.
deshdootmidc@gmail.com



देशदूत
My जळगाव
। गुरुवार, दि. १५ मे २०२५ । पान ६ ।



जाहिरात कात्रण आणल्यास विशेष सूट
भारतातील प्रसिद्धीप्राप्त गुप्तरोग चिकित्सक
लैंगींक समस्या, गुप्तरोग
शीघ्रपतन, नपुसंकता, मुल न होणे, शुक्राणूंची कमी आणि मधुमेहाने आलेल्या कमजोरीवर कमी दिवसात खात्रीशीर इलाज केला जाईल.
(टीप: रुग्णालयात येण्याआधी फोन करुन अपॉईंटमेंट घ्यावी.)
(EMD) नकली डॉक्टर केंद्रोंसे सावधान
डॉ.मंशा डिस्पेन्सरी
प्रकाश टॉकीजमागे, बऱ्हाणपूर (म.प्र.) (कॉम्प्युटराईज्ड)
०७३२-५२५१४५९. मोबा.९८२६२७८८७१
भोंदू वैद्यांपासून सावध रहा! । रुग्णालय दररोज सुरु असते. वेळ सकाळी ११ ते रात्री ९
(आपला पत्रव्यवहार किंवा उपचाराची माहिती गुप्त ठेवली जाईल.)




# शांताबाई अकाऊंटवरुन खंडणीचा गोरखधंदा

## शिक्षकाकडून रणजीत दराडे, मुराद पटेल, इम्रान शेख यांनी उकळली ३० हजारांची खंडणी

**चाळीसगाव । प्रतिनिधी**

चाळीसगाव गेल्या सहा माहिन्यापासून शांताबाई अकाऊंटच्या माध्यामातून सोशल मिडियावर धुमाकूळ घालणाऱ्या शांताबाईच्या माध्यमातून अनेकांकडून त्यांची बदनामी न करण्यासाठी खंडणीचा गोरखधंदा उघडकीस आला आहे. शहरातील एका शिक्षकांकडून त्याची बदनामी थांबविण्यासाठी ३० हजार रुपयांची खंडणी उकल्याप्रकरणी दि, १४ रोजी चाळीसगाव पोलीस स्टेशनला रणजीतकुमार सुदेशकुमार दराडे, पत्रकार मुराद ईब्राहीम पटेल, इम्रान शेख शब्बीर(राजू किंग) व त्यांचे इतर साथीदारांविरुद्धात गुन्हां दाखल करण्यात आला आहे. यामुळे चाळीसगावात एकच खळबळ उडाली आहे.

### चाळीसगाव पोलिसात गुन्हा दाखल

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शेख अजीज शेख बशीर खाटीक वय-४४ वर्षे, व्यवसाय- शिक्षक, रा. त्रिमुर्ती बेकरी जवळ नागदरोड चाळीसगाव यांनी चाळीसगाव पोलिसात दिलेल्या फिर्यादीनूसार ते माध्यमिक विद्यालय हिंगोणे खु.ता.चाळीसगाव याठिकाणी शिक्षक म्हणुन नोकरी करतात, ते फेसबुक पाहतात, फेसबुक वर शांताबाई नावाचे अकाऊंट ते फोलो करती होते. दि.१७ एप्रिल २०२५ रोजी रोजी रात्री ११.५० वा. ते फेसबुक बघत असताना, शांताबाई अकाउंट वर ग्रामपंचायत कार्यालय ता. चाळीसगाव दि. जळगाव यांनी चेअरमन रा.स.शि. प्र.मंडळ चाळीसगाव यांना केलेला अर्ज दिसुन आला. त्यात मागील ४ महिन्यापासुन खुप तक्रारी येत आहेत व त्यांच्या बद्दल शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी देखील त्रस्त आहेत. सदर वादग्रस्त शिक्षकाची तात्काळ बदली करावी असा मजकुराचा अर्जाची पोस्ट केलेली त्यांना दिसली होती. सदरचा अर्ज बघुन त्यांना आठवले की, मी नोकरी करत असलेल्या शाळेत माझे विरुद्ध अशाच स्वरुपाचा तक्रारी अर्ज प्राप्त आहे. त्यामुळे हा तोच अर्ज असावा असे मला वाटले होत. त्यामुळे त्यांनी मेसेंजर ॲपवरुन शांताबाई नावाचे अकाऊंटला मेसेज केला. त्यांना मी मेसेज द्वारे विचारले की, तुम्ही मला ओळखतात का ? त्यावेळी त्यांनी मला ओळखत असल्याचे सांगीतले होते. त्यानंतर इतर ही विषयावर चर्चा झाली होती. त्यावेळी त्यांना त्यांचे नाव विचारले असता ते नाव सांगण्यास टाळाटाळ करत होते. फक्त आमची टीम आहे असे सांगत होते. तसेच संबंधीत व्यक्तीची सामाजिक, शैक्षणिक व इतर बदनामी कारण नसताना केली जात असुन ती बदनामी थांबवावी अशी विनंती, त्यावर त्यांनी मुराद ला जाऊन भेटुन घ्या, काय विषय आहे सविस्तर सांगा म्हणजे आमचे गैरसमज दुर होतील. त्यानतंर अजीज खाटीक हे दि.१९एप्रिल २०२५ रोजी शांताबाई अकाऊंट चालविणाऱ्याच्या सांगण्यावरुन मुराद पटेल यांच्या ऑफीसला गेले होतो. त्यावेळी मुराद पटेल यांना रोख २०,००० रुपये दिले होते. त्यानंतर त्याच दिवशी पुन्हा मुराद पटेल यांना जाऊन भेटलो असता, मला मुराद पटेल यांनी मला सांगीतले की, शांताबाई याचे बँक अकाऊंटवर पैसे जमा केले आहेत. त्याबाबत मेसेंजवर शांताबाई यास मेसेज करुन पैसे मुराद पटेल कडे दिले बाबत माहिती दिली असता, त्यांनी अजीज खाटीक यांना सांगीतले की, हे २० कॅशचे मला माहिती नव्हत. रात्री बघा मी कसा घोडा लावतो, सगळ्यांनी माझी ४० ते ५० जणांची टीम आहे असे मेसेज केले होते. त्यावर मी त्यांना कोणाला बोलणार आहेत असे विचारले असता त्याने सांगीतले की, हे २० घेणाऱ्यांना असा मेसेज केला होता. त्यानंतर त्यांनी मला दिलेल्या नंबर वर पुन्हा १०,००० रुपये ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यास सांगीतले असता १९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५. वा.चे सुमारास मोबाईल नंबर ९९२१३२३६२१ हा फोन पेॲप वर टाकला असता, तो नंबर इम्रान शेख शब्बीर याचे नावाचे बँकचे अकाऊंट असले बाबत दिसुन आले. त्यावर अजीज खाटीक यांनी १० हजार रुपये ऑनलाईन पद्धतीने पाठविले आहेत. परंतु अजीज खाटीक नावाने झालेल्या पोस्टमुळे त्यांना खुप त्रास सहन करावा लागला समाजातील विविध लोकांनी मला विचारणा केली आहे. त्यानंतर त्यांनी पैसे परत मागीतले असता, त्यांनी अजीज खाटीक यांचे पैसे परत केले नाहीत. त्यानंतर दि.१२ मे२०२५ रोजी सायंकाळी अजीज खाटीक यांना समजले की, फेसबुक वरुन शांताबाई अकाऊंट चालविणारा इसम नामे रणजीतकुमार सुदेशकुमार दराडे रा. गवळीवाडा नेताजी चौक चाळीसगाव यास नाशिक येथील पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. त्यामुळे अजीज खाटीक यांची खात्री झाली शांताबाई अकाऊंटवर अशा बदनाम्या कारक पोस्ट टाकुन रणजीत कुमार दराडे व त्याचे सहकारी लोकांना अजुन त्यांची बदनामी होऊ नये म्हणुन त्यांचे कडुन खंडणी स्वरुपात पैश्याची मागणी करतात. याप्रकरणी चाळीसगाव पोलीस स्टेशनला शिक्षक अजीज खाटीक यांच्या फिर्यादीवरुन रणजीतकुमार सुदेशकुमार दराडे, मुराद ईब्राहीम पटेल, इम्रान शेख शब्बीर व त्यांचे इतर साथीदारां विरुद्धात गुन्हां दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### सखोल चौकशीची आवश्यकता

एका फेक फेसबुक अकाऊंडवरुन एक शिक्षक पत्रकारकडून दुसऱ्या पत्रकाराने खडणीची रक्कम वसुल केल्याचा प्रकार चाळीसगाव तालुक्यात प्रथम घडला आहे. तर गेल्या अनेक दिवसांपासून शांताबाई अकाउंडवरुन प्रतिष्ठीत लोकांची बदनामी होत होती. तरी देखील चाळीसगाव पोलीस हातावर हात धरुण बसले होते. चाळीसगव पोलिस स्टेशनचे वरिष्ठ आधिखारी नेमहीच सांगतात की मी सायबल सेलमध्ये काम केले आहे, तरी देखील शांताबाई त्यांच्या हाती का ? लागत नव्हती, याबाबत प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे चाळीसगाव पोलिसांतील काही कर्मचारी देखील यात खंडणीत शामिल होते का ? असा संशय आता व्यक्त केला जात असून वरिष्ठ पोलीस आधिकाऱ्यांनी याची खोलात जावून चौकशी करण्याची आवश्यकता आहे, यामुळे खंडणी उकलणारी संपूर्ण गँगाचा पर्दापाश होईल. कारण ज्या पत्रकारावर गुन्हां दाखल झाला आहे, तो नेहमीच सोशल मिडियावर अपडेट राहतो, यापूर्वी देखील त्याच्यावर गुन्हे दाखल झाले असल्याचे तक्रारकर्त्याचे म्हणने आहे.

## थोडक्यात...

### शुक्रवारपासून १२वींच्या गुणपत्रिकांचे वाटप

**जळगाव ।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इ. १२ वीच्या परीक्षेचा निकाल सोमवार, दि. ५ मे २०२५ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन पद्धतीने जाहीर केला. या परीक्षेच्या गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्रे व तपशीलवार गुणपत्रकांचे शालेय अभिलेख दिनांक १६ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता संबंधित विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना वितरित करण्यात येणार आहेत.त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३ वाजता संबंधित शाळा व महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका वितरित केल्या जातील. या अनुषंगाने सर्व प्राचार्य, विद्यार्थी व पालक यांनी योग्य ती नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षण मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

### गांजा ओढणाऱ्या दोघांवर कारवाई

**जळगाव ।** शहरातील आरएल चौफुलीजवळील महादेव मंदिराजवळील मोकळ्या जागेत गांजा ओढणाऱ्या दोघांवर एमआयडीसी पोलिसांनी कारवाई केली. याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील आरएल चौफुलीजवळील महादेव मंदिराच्या परिसरात जोतमल तपेश्वर राठोड (वय २५, रा. सुप्रिम कॉलनी) व वरुण रमेश गोयल (वय २१, रा. सुप्रिम कॉलनी) हे दोघ मोकळ्या जागेत गांजा ओढीत होते. याबाबतची माहिती मिळताच एमआयडीसी पालिसांनी त्यांच्यावर कारवाई केली. त्यांच्याकडून गांजासह ते ओढण्याचे साहित्य जप्त करण्यात आले असून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अज्ञात चोरट्यांनी भास्कर मार्केट परिसरातून दुचाकी लांबविली

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील भास्कर मार्केट परिसरात शेख सज्जाद हुसैन शेख कादर (वय २६, रा. नशिराबाद, ता. जळगाव) हा दि. १० रोजी (एमएच १९, डीआर ४४८०) क्रमांकाच्या दुचाकीने आला होता. त्यांची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. त्यांनी संपुर्ण परिसरात दुचाकीचा शोध घेतला, मात्र तरी देखील दुचाकी मिळून न आल्याने अखेर त्यांनी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## फसवणूक करणाऱ्या दोघ अनोळखींविरुद्ध गुन्हा दाखल

**जळगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील रिधूर गावात निखिल कोळी हा तरुण वास्तव्यास असून तो सेंट्रींग काम करतो. दि. १३ रोजी रोजी तो सायंकाळी काम आटोपल्यानंतर सुभाषचौकात बाजार करण्यासाठी गेला होता. तेथून श्रीराम चौकात राहणारा त्याचा मित्र गणेश दिलीप सोनवणे याला भेटण्याकरीता गेला होता. तेथे रात्री जेवण केल्यानंतर तो दहा वाजेच्या सुमारास घरी जाण्यासाठी निघाला. शिवाजी नगर उड्डाणपुलावरुन जात असतांना दोन अनोळखी इसमांनी त्याला थांबवले. त्यांनी आम्हाला पुलाच्या पलीकडे सोडून दे असे सांगितल्याने निखीलने त्या दोघांना गाडीवर बसवून घेतले.

उस्मानिया पार्क पर्यंत घेवून गेले. त्याठिकणी एका टपरीवर सिगरेट व पान घेण्यासाठी थांबले. निखील हा टपरीवर पानसुपारी घेण्यासाठी उतरला असता, त्या दोघ इसमांनी निखीलची (एमएच १९, डीएक्स ४५४०) क्रमांकाची दुचाकी आणि त्याच्या डिक्कीट ठेवलेला मोबाईल चोरुन नेला. याप्रकरणी दोघ अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## अल्पवयीन मुलीला पळवून नेणाऱ्या विरुध्द पोस्को कलमान्वये गुन्हा

**जळगाव । प्रतिनिधी**

१३ वर्षीय अल्पवयीन मुलीला पळवून नेणाऱ्या वसीम निसार शहा (३४, रा. तांबापुरा) याला एमआयडीसी पोलिसांनी सुरत येथून ताब्यात घेतले. त्याला जळगावात आणले असून त्याच्याविरुद्ध पोस्को कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसीम हा वापी येथे गेल्यानंतर जळगावात इतरांशी संपर्क करीत राहिला व त्यातूनच तो जाळ्यात अडकला.

एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका परिसरातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलगी ३ मे रोजी बेपत्ता झाली होती. या विषयी एमआयडीसी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली. या मुलीचा शोध घेत असताना तिला तांबापुरा परिसरातील एका तरुणाने पळविल्याची माहिती पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पोकॉ इम्रान बेग यांना शोध घेण्याविषयी सूचना दिल्या. वसीम हा कोणाच्या संपर्कात होता, तो कोठे आहे व इतर तांत्रिक मुद्यांद्वारे तरुणाची माहिती मिळविली. तो अल्पवयीन मुलीसह वापी येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार बेग तेथे पोहचले. त्यानंतर तरुण व मुलगी सुरत येथे गेले, तेथून त्यांना ताब्यात घेतले. दोघांनाही बुधवारी (१४ मे) जळगावात आणले. या प्रकरणात वसीमविरुद्ध पोस्को कलमनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

## फालीचे फलित

### मल्चिंगसह आधुनिक पद्धतींचा वापर

*(जळगाव येथे जैन हिल्स् परिसरात फालीचे अधिवेशन नुकतेच संपन्न झाले. यातील यशस्वी विद्यार्थ्यांचे क्रमशः मनोगत देत आहोत.)*



तैय्यबने २०१८ ते २०१९ या काळात फाली (FLI) ६ संमेलनामध्ये भाग घेतला होता. त्याने इतिहासात बीए केले आहे आणि त्याने त्याच्या सहा एकर एफ अँड व्ही फार्ममध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे.

तय्युब हा एक समर्पित शेतकरी आहे. त्याने त्याच्या सहा एकर शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. तो प्रामुख्याने टरबूज आणि काकडीची लागवड करतो. मल्चिंगसह आधुनिक पद्धतींचा वापर केल्यामुळे त्याचे उत्पादन जास्त येते. त्याचे टरबूजचे उत्पादन प्रति एकर ७०००-८००० किलो आहे आणि काकडीचे उत्पादन प्रति एकर ५०० किलो आहे. हे उत्पादन इतर शेतकऱ्यांपेक्षा सुमारे ३-४ टक्के जास्त आहे. आर्थिक वर्ष २०२४/२५ मध्ये, त्याने आधुनिक शेतीचे आर्थिक फायदे दाखवून ३.५-४ लाख रुपयांचा नफा कमावला.

■ **तैय्यब तडवी**
लोहारा, ता.रावेर,
जि.जळगाव

### दुधाचा यशस्वी व्यवसाय



स्वप्नील २०१९ ते २०२० या काळात फाली ७ मध्ये सहभागी झाला होता. म्हशींच्या दुधाचा यशस्वी व्यवसाय चालवत असताना कॉम्प्युटर ॲप्लीकेशन (संगणकाचे उपयोग)मध्येपदवी मिळवण्यासाठी (बीसीए) प्रयत्न करत आहे.

स्वप्निलने ड्रॅगन फ्रूट लागवडीवरील त्याच्या टीमच्या प्रकल्पासह त्याने शालेय स्तरावरील व्यवसाय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. तो बीसीए ही कॉम्प्युटरमधील पदवी घेत आहे.

स्वप्निल पिढ्यानपिढ्या चालत आलेला एक यशस्वी म्हशी दूध उत्पादन व्यवसाय चालवतो. सध्या तो स्वच्छ वातावरणात १० निरोगी म्हशींचे संगोपन करतो, स्वच्छता आणि निरोगी खाद्यान्नाच्या त्याच्या वचनबद्धतेसह दर्जेदार दूध उत्पादन करतो. ग्राहकांच्या समाधानावर त्याचे लक्ष केंद्रित केल्यामुळे स्वप्निलला स्थानिक खरेदीदारांशी मजबूत संबंध ठेवता आले आहेत. आर्थिक वर्ष २०२४ / २५ मध्ये त्याचे उत्पन्न ९- ९.५ लाख रुपये होते आणि त्याचा नफा ४.५-५ लाख रुपये होता.

■ **स्वप्नील पाटील**
चहार्डी, ता.चोपडा,
जि.जळगाव

# तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती उत्साहात



### बौद्ध पंच मंडळ

नशिराबाद येथील बौद्ध पंच मंडळातर्फे तथागत गौतम बुद्ध यांची २५६९ व्या जयंतीनिमित्त. धम्मदेशना बौद्ध धर्म गुरु भंते धम्मदीप थेरो यांच्या सूत्रपठाण व बौद्ध पूजा करण्यात आली. सायंकाळी बुद्धम. शरणं. गच्छामि. या सूत्र पठणाने भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. मिरवणुकीत पांढरशुभ्र पोशाख परिधान करून बौद्ध उपासक उपासिका यांनी कॅण्डल मार्च काढला. तसेच बुद्ध विहार येथे खीरदानचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी बौद्धाचार्य तुषार रंधे यांनी यावेळी मार्गदर्शन केले.विहारामध्ये तथागत गौतम बुद्ध यांचे पूजन व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन जयंती समितीचे अध्यक्ष दीपक सपकाळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता बौद्ध समाजाचे अध्यक्ष विनोद रंधे यांच्या हस्ते करण्यात आली, यावेळी बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बुध्द जयंती



**जळगाव ।** बुद्धं सरणं गच्छामि च्या मंगल निनादात जगाला शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती सर्वत्र उत्साहाज साजरी करण्यात आली.



### जयंती उत्सव समिती,वाघनगर

बुद्ध पौर्णिमेनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समिती वाघ नगर च्या वतीने सम्राट अशोक ध्यान साधना केंद्र येथे त्रिसरण पंचशील घेऊन धम्म रॅली काढण्यात आला. त्रिसरण पंचशीलाच्या जयघोषात रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शिवाजी महाराज चौक, परिवर्तन चौक, विशाल कॉलनी, छत्रपती कॉलनी मार्गाने रॅली काढण्यात येवून ठीक ठिकाणी धम्म उपासक उपासिकांनी रॅलीचे स्वागत केले. तसेच आंबेडकर चौक येथे खिरदानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रसंगी, जयंती उत्सव समिती अध्यक्ष चेतन बागुल उपाध्यक्ष रोहित मनुरे विनोद सपकाळे, रवींद्र तायडे , डॉ. अशोक हनवते, डॉ चंद्रकांत भालेराव, श्री. भास्कर, राकेश पाटील, साहेबराव बागुल, संदीप केदार, किशोर साळुंखे, विष्णू तायडे, अमोल नन्नवरे, सुमित जाधव, चंद्रमणी सोनवणे, मिलिंद सोनवणे, मनोज भालेराव, मनोज अडकमोल, शिवदास बागुल, दिलीप उमाळे, युवराज पारधे, संतोष मेढे, संतोष मनुरे, महामाया प्रजापती ग्रुप, भीम कन्या ग्रुप, परिसरातील सर्व धम्म उपासक उपासिका याप्रसंगी उपस्थित होते.

### रिपाइं (खरात)

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) तर्फे तथागत भगवान गौतम बुध्द जयंतीनिमित्त त्रिशरण पंचशिल ग्रहण करण्यात येवून जिल्हाध्यक्ष जे.डी.भालेराव यांनी तथागत भगवान गौतम बुध्दांच्या प्रतिमेस पुष्प वाहून सामुहिक वंदना घेतली. याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष दिलीप सपकाळे, महानगर अध्यक्ष सिध्दार्थ गव्हाणे, निखिल गुजर, भिमराव बिऱ्हाडे, विजय पाटील, यशवंत घोडेस्वार, शरद धनगर, अण्णा अडकमोल, विक्रम भालेराव, दिपाली गव्हाणे, सुरेखा भालेराव, निशा अडकमोल, शोभना भालेराव, आकाश पाटील, किरण सुरवाडे, नितीन पाटील आदी उपस्थित होते.



### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती निमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तर्फे शहरातील समतानगरात खीरदान करण्यात आले. सायंकाळी ७ वाजता त्रिशरण पंचशिल ग्रहण करण्यान येऊन तथागत भगवान गौतम बुद्धांची पुजा करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला महानगर अध्यक्ष अनिल अडकमोल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पन करण्यात आला यशस्वीसाठी शारदा अडकमोल संगिता अडकमोल उज्वला अडकमोल सोनाली अडकमोल योगिता इंगळे विमल सपकाळे रेखा अहिरे रुपाली बनसोडे रमा बनसोडे छाया सोनवणे सुनिता खरोटे ललीता अडकमोल पुजा पवार शितल सोनवणे सुषमा अहिरे कामीना अडकमोल मंगला कुमावत सुषमा सोनवणे विमल वाघ दादाराव अडकमोल प्रताप बनसोडे राजेश साळुंखे किरण अडकमोल हरीष शिंदे मुकेश ढिल्लोरे उत्तम बनसोडे मिलिंद अडकमोल दिलीप अहिरे दिपक वाघ जुलाल बाविस्कर रोहित गायकवाड यांचेसह परिसरातील नागरीक उपस्थित होते,